# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 24/12/2021 (शुक्रवार)
(सकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत सालई हिवराबाजार येथे दिनांक 22/12/21 चे 15:00 वा. ते 17:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. छबीलाल जमनाप्रसाद राउत, वय 50 वर्ष, रा. सालई हिवराबाजार या घराला कुलुप लावुन शेतामध्ये गेल्या होतया. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने घरातील गोदरेज आलमारी मधुन लॉकर मधील ठेवलेल्या जर्मणच्या डब्यामध्ये ठेवलेले 1. सोन्या–चांदीचे दागिने कि. 18,000/–रू. व नगदी 40,000/–रू. असा एकुण कि. 58,000/– रू. मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक मोरेश्वर मो.क्र. 8600655085 हे करीत आहे.

### चोरी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 01 कि.मी. अंतरावरील गळपुरा चौक काटोल येथे दिनांक 20/12/21 चे 19:15 वा. ते 19:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ नेहा नारायण डागा वय 30 वर्ष, रा. फल्ली मार्केट, ह.मु गळपुरा चौक काटोल ता काटोल हि आपले आईचे घरी पाहुणपणा करीता गेली होती. फिर्यादीने आरोपी नामे– सुहानी पठान रा. गळपुरा चौक काटोल ता. काटोल यास मेहंदी व केस कापन्याकरीता घरी बोलविले होते. त्यादरम्यान आरोपीने फिर्यादिचे हातावर मेहंदी काढली व केस सरळ केल व केस कापण्याकरीता मान खाली केली व पाच मिनीट मान खालीच ठेवली व पाच मिनीट नंतर म्हणाली की, तुमचे झाले तेव्हा लगेच तिथे फिर्यादिची आई आली व फिर्यादिस 'तुझ्या गळयातील सोण्याची चैन कुठे गेली' असे विचारले असता चैन घरात शोधली त्यानंतर मिळाली नाही. नंतर आरोपी ही घरातुन निघुन गेली. आरोपीने फिर्यादीची सोन्याची 14 ग्रॅम ची चैन किंमती 64,000/–रू ची हातचालाखीने चोरून नेल्याचे संशय आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार चव्हाण पो.स्टे. काटोल मो.नं. 9823348374 हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत एनटीपीसी कंपनी मौदा जि.नागपुर येथे दिनांक 22/12/21 चे 14.00 वा ते 23/12/21 चे 06.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– शुभम गोपाल रहांगडाले, वय 25 वर्ष, रा. बाबदेव ता.मौदा जि. नागपुर हा रोजप्रमाणे एनटीपीसी कंपनी मध्ये कामाला गेला होता. त्यादरम्यान त्याने त्याची एमएच– 40/सीजे–0396 क्रमांकाची मोटरसायकल ही कंपनीच्या गेट समोर उभी ठेउन कामावर गेला व परत येवुन त्याने पाहीले असता त्याची मोटरसायकल मिळुन आली नाही. फिर्यादी यांची कि. 50,000/–रू. ची मोटरसायकल अज्ञात आरोपीने चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार देशमुख मो.क्र. 9588679814 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर